TATA
# EQUITY OPPORTUNITIES FUND
(An Open-ended Equity Scheme)

TATA MUTUAL FUND
Expertise that's trusted



# बाजारपेठेतील संधींवर नजर ठेवणारा फंड

हे उत्पादन अशी अपेक्षा असलेल्या गुंतवणूकदारांसाठी योग्य आहे# :

- दीर्घकालीन भांडवल वृद्धी
- बाजारपेठेच्या कॅपिटलायझेशनच्या सर्व क्षेत्रातील चांगले संशोधन केलेल्या मूल्य आणि विकासाभिमुख कंपन्यांच्या इक्विटी आणि इक्विटीशी संबंधित इन्स्ट्रुमेन्टसमध्ये गुंतवणूक
- ह्या योजनेचे **उच्च जोखीम** ■ **(तपकिरी)** असे वर्गिकरण करण्यात आले आहे. त्यांच्या मुद्दलाला उच्च जोखीम आहे हे गुंतवणूकदारांना हे माहित आहे.

**#हे उत्पादन त्यांच्यासाठी योग्य आहे का ह्याबद्दल शंका असल्यास गुंतवणूकदारांनी त्यांच्या आर्थिक सल्लागाराचा सल्ला घ्यावा.**

**टीप:** जोखमीचे स्वरूप अशा प्रकारे दाखविले जाते:

(तपकिरी) गुंतवणूकदारांना माहिती असते की त्यांच्या भांडवलाला उच्च जोखीम आहे.

(पिवळा) गुंतवणूकदारांना माहिती असते की त्यांच्या भांडवलाला मध्यम जोखीम आहे.

(निळा) गुंतवणूकदारांना माहिती असते की त्यांच्या भांडवलाला कमी जोखीम आहे.

**म्युच्युअल फंडातील गुंतवणुकीला बाजारपेठेतील जोखमी लागू असतात, योजनेशी संबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचा.**

## गुंतवणुकीची तत्वप्रणाली

टाटा इक्विटी अपॉर्च्युनिटी फंड हा वैविध्यपूर्ण इक्विटी फंड आहे. ज्यात इक्विटी बाजारपेठेतील संधी निश्चित करण्यासाठी सखोल संशोधन केले जाते. उदाहरणार्थ, बाजारपेठेत पुनर्मूल्यांकन करण्यात आलेल्या किंवा विकासाभिमुख कंपन्या, बदलत्या आर्थिक धोरणांचा लाभ होणाऱ्या कंपन्या वगैरे.

गुंतवणुकीचा निर्णय घेण्यासाठी, फंड व्यवस्थापक मॅक्रो–इकॉनॉमिक वातावरणाचे आणि उद्योगाला चालना देणाऱ्या महत्त्वाच्या घटकांचे तपशिलवार निरिक्षण करतात. गुंतवणुकीच्या दृष्टीकोनात वरून खाली अशा पद्धतीने क्षेत्रांवर लक्ष केन्द्रित केले जाते आणि मध्यम ते दीर्घकालीन कालावधीत मूलत: चांगल्या वाटणाऱ्या कंपन्या निश्चित करण्यासाठी कंपन्या खालून वर अशा पद्धतीने निश्चित केल्या जातात. मूल्यांकनावर खूप ताण पडत आहे असे वाटेपर्यंत अशा कंपन्यांमध्ये गुंतवणूक कायम ठेवणे हा गुंतवणुकीचा दृष्टीकोन आहे. अशा प्रकारे, फंडात पोर्टफोलिओच्या समावेशावर सातत्याने देखरेख ठेवून जोखीम कमी करण्याचा प्रयत्न केला जातो.

## टाटा इक्विटी अपॉर्च्युनिटी फंड का?

### पोर्टफोलिओचे सक्रिय व्यवस्थापन

- सक्रिय व्यवस्थापन लाभलेला वैविध्यपूर्ण इक्विटी फंड असल्यामुळे ह्या फंडात बाजारपेठेच्या विविध परिस्थितीत भांडवल वृद्धीच्या संधींचा लाभ घेता येतो.

### स्टाईलच्या बाबतीत कोणताही भेदभाव नाही

- बाजारपेठेतील वातावरण आणि संधींनुसार पोर्टफोलिओ योग्य प्रकारे निश्चित करण्यासाठी ह्या फंडात 'मूल्य' आणि 'विकास' अशा दोन्ही प्रकारच्या गुंतवणुकीचे मिश्रण केलेले असते.

### मार्केट कॅपच्या बाबतीत भेदभाव नाही

- बाजारपेठेतील विविध भांडवलीकरणाच्या विभागांनुसार गुंतवणुकीच्या दृष्टीकोनातून पोर्टफोलिओ योग्य प्रकारे निश्चित करण्यासाठी कोणत्याही ठराविक मार्केट कॅप गटात अधिक वाटप करण्याची लवचिकता.

### संशोधनाद्वारे स्टॉक्सची निवड

- कंपनीच्या मूलभूत क्षमतेला आणि मूळ व्यवसायांना अधिक महत्त्व दिले जाते.
- चांगले व्यवस्थापन, चांगल्या दर्जाच्या कंपन्यांना आणि सरासरीपेक्षा अधिक विकासाची शक्यता असलेल्या कंपन्यांवर अधिक लक्ष केन्द्रित.

## कोणी गुंतवणूक करावी व का

- 3 वर्ष किंवा अधिक काळ गुंतवणूकीचे उद्दिष्ट असलेले आणि माफक ते आक्रमक जोखीम घेण्याची इच्छा असलेले गुंतवणूकदार.
- निश्चित मार्केट कॅप किंवा स्टाईलच्या बाबतीत भेदभाव न करणारे वैविध्यपूर्ण इक्विटी फंडात गुंतवणूक करण्याची इच्छा असलेले गुंतवणूकदार.
- अनेक तेजी व मंदिच्या बाजारपेठेतील चक्रात 21 वर्षांच्या कामगिरीचा इतिहास.

*वितरक :*